N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली  **P.S.(ठाणे):** कडेगांव

**Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0222

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 10/10/2022 21:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार

**Time Period (कालावधी):** पहर 5

**Date From (दिनांक पासून):** 10/10/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 10/10/2022

**Time From (वेळेपासून):** 14:35 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 10/10/2022  **Time (वेळ):** 20:42 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 017

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 10/10/2022 20:42 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 15 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तलाठी कार्यालय खेराडवांगी, खेराडवांगी,कडेगांव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. दत्तात्रय अशोक सुर्यवंशी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | खेराडेवांगी,कडेगांव,कडेगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | खेराडेवांगी,कडेगांव,कडेगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): शेतकरी

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-7038975006

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती मनिषा मोहनराव कुलकर्णी | | | 1. ब्राम्हणपूरी,इस्लामपूर ,वाळवा, इस्लामपूर,सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
वर्दीजबाब ता. 10.10.2022

मी दत्तात्रय अशोक सुर्यवंशी वय 35 वर्ष व्यवसाय:- शेती रा. मु.पो. खेराडे वांगी ता. कडेगांव जि.सांगली मो.नं. 7038975006.

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास आहे. माझे वडील अशोक रामचंद्र सुर्यवंशी यांचे नावे खेराडे वांगी येथील गट नं 1574 मधील 0 हे 48 आर क्षेत्र व माझे चुलते जोतीराम रामचंद्र सुर्यवंशी यांचे 0 हे 59 आर इतके क्षेत्र पुनर्वसनासाठी शासनाने सन 1999 मध्ये संपादीत केली आहे. तत्कालीन तलाठी यांनी वरील गट नंबर मध्ये खातेदार यांचे नावापुढे कब्जेपट्टीप्रमाणे आणेवारी न लावता चुकीची आणेवारी लावलेली होती. सदरची 7/12 वरील चुकीची आणेवारी दुरूस्त होवून मिळणेसाठी आम्ही दि.01.11.2021 रोजी मा.तहसिलदार कडेगांव यांचेकडे अर्ज केला आहे. सदर कामा संदर्भात आम्ही तहसिलदार कार्यालय कडेगांव तसेच तलाठी कार्यालय खेराडेवांगी या ठिकाणी जाऊन चौकशी करीत होतो.

दि.27.09.2022 रोजी मंडल अधिकारी श्री.सुर्यवंशी यांनी माझा लहान भाऊ बालाजी यास संपर्क करून तलाठी कार्यालय खेराडे वांगी या ठिकाणी येण्याबाबत कळविले होते. त्याप्रमाणे मी, माझे वडील, माझा भाऊ असे तलाठी कार्यालय खेराडे वांगी या ठिकाणी जाऊन मंडल अधिकारी श्री.सुर्यवंशी यांची भेट घेतली त्यावेळी तलाठी कार्यालयात तलाठी मॅडम कुलकर्णी ह्या देखील हजर होत्या. त्यावेळी मंडल अधिकारी सुर्यवंशी यांनी आमचे कब्जेपट्टीप्रमाणे आणेवारी लावून सातबारा दुरूस्तीचे काम तात्काळ करून देण्याबाबत तलाठी मॅडम कुलकर्णी यांना आमचे समक्ष सुचना दिल्या होत्या.

त्यानंतर मी दुस-या दिवशी तलाठी कार्यालयात गेलो असता कुलकर्णी मॅडम कार्यालयात आला नव्हत्या त्यानंतर दि.29.09.2022 रोजी मी, माझे वडील, माझा भाऊ असे तलाठी कार्यालयात आमच्या कामा संदर्भात चौकशी करण्यासाठी गेलो असता त्यावेळी तलाठी कुलकर्णी मॅडम कार्यालयात हजर होत्या. माझ्या वडीलांनी त्यांना कामाबाबत विचारले असता कुलकर्णी मॅडम यांनी पुनर्वसनामधील जमीनीचा 7/12 उतारा कब्जेपट्टीप्रमाणे आणेवारी लावून दुरूस्तीचे काम पुर्ण करून देत असल्याचे सांगून त्यासाठी 20,000/- रूपये द्यावे लागतील असे सांगीतले. त्यावेळी आम्ही आम्हाला एवढी रक्कम देणे शक्य नसल्याचे सांगून निघून आलो.

तलाठी कार्यालय खेराडे वांगी येथील तलाठी कुलकर्णी मॅडम यांनी आमची पुनर्वसनामधील जमीनीचा 7/12 उतारा कब्जेपट्टीप्रमाणे आणेवारी लावून दुरूस्त करून देण्यासाठी माझ्या वडीलांकडे 20,000/- रूपये मागीतले असून कुलकर्णी मॅडम हे माझ्याकडे मागत असलेले 20,000/- रूपये लाचेचे असून मला तसेच माझ्या वडीलांना कुलकर्णी मॅडम यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने दि.30.09.2022 रोजी मी श्री.सुजय घाटगे पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो सांगली यांची भेट घेवून माझी तक्रार असल्याचे सांगीतले होते. घाटगे साहेब यांनी त्यांचे कार्यालयातील श्री.दत्तात्रय पुजारी पोलीस निरीक्षक यांची ओळख करून दिली. मी माझा तलाठी कुलकर्णी मॅडम यांचे विरूध्दचा तक्रारी अर्ज पुजारी साहेब यांचे समक्ष हजर केला. पुजारी साहेब यांनी त्यांचे ब्युरोच्या कार्यप्रणाली प्रमाणे सविस्तर माहिती दिली.

तलाठी कुलकर्णी मॅडम त्यांचे कार्यालयात हजर नसतात. त्यामुळे तलाठी कुलकर्णी मॅडम ह्या तलाठी कार्यालयात हजर असल्याचे माहिती मिळाल्यानंतर तात्काळ कळवण्याबाबत सुचना देऊन मला जाण्यास सांगीतले.

दि.07.10.2022 रोजी मी खेराडे वांगी ग्रामपंचायत कार्यालयाजवळ गेल्यानंतर तलाठी कुलकर्णी मॅडम ह्या कार्यालयात हजर असल्याचे मला दिसलेने मी तात्काळ घाटगे साहेब यांना संपर्क करून कल्पना दिली. घाटगे साहेब यांनी मला खेराडे वांगी गावाच्या बाहेर आल्यानंतर संपर्क करीत असल्याचे सांगून त्या ठिकाणी येऊन भेट घेण्याबाबत सुचना दिल्या. त्यानंतर घाटगे साहेब यांनी संपर्क करून कळविले प्रमाणे मी कोतीज गावामधील तलावा जवळ जावून घाटगे साहेब यांची भेट घेतली त्यावेळी त्यांचे सोबत पुजारी साहेब व त्यांचे पथक हजर होते. पुजारी



Scanned with OKEN Scanner

साहेब यांनी त्यांचे सोबत आलेले दोन शासकीय पंच तसेच त्यांचा स्टाफ यांची ओळख करून दिली.

पुजारी साहेब यांनी सदर कारवाईसाठी श्री. विकास पांडुरंग कांबळे यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री. प्रमोद अशोक साखळकर यांनी पंच नं. 2 म्हणुन काम करण्याचे ठरवले. पुजारी साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी माझी तक्रार दोन्ही पंचासमक्ष सांगितली. त्यानंतर पुजारी साहेब यांनी माझा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला त्यांनी तो वाचून त्यावर सह्या केल्या.

पुजारी साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत माहिती देवून त्यामध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. पुजारी साहेब यांनी मला व पंच कांबळे यांना पडताळणी कामी सुचना दिल्या. त्यानंतर पुजारी साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. मी तो माझे शर्टचे समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवला. पुजारी साहेब यांनी दिले सुचनेप्रमाणे मी व पंच कांबळे असे माझ्याकडील बजाज कॅलीबर कंपनीची मोटरसायकल रजि.क्र. एम. एच.10 व्हि. 6895 वरून रवाना होवून तलाठी कार्यालय खेराडे वांगी येथे गेलो. मी माझी मोटरसायकल पार्कींग ठिकाणी पार्क करून मी व पंच कांबळे असे तलाठी कार्यालयात जाऊन कुलकर्णी मॅडम यांची भेट घेतली. त्यावेळी कार्यालयात लोकांची गर्दी असल्याने मी व पंच कांबळे काही वेळ त्या ठिकाणी थांबून राहीलो. काही वेळानंतर मी कुलकर्णी मॅडम यांना माझ्या कामा संदर्भात विचारले. मॅडमनी माझ्या कामा संदर्भात विचारून घेवून प्रकरण घेतले असल्याचे सांगून त्यात कोण कोण असेल ते करावे लागणार असे म्हणाले. त्यानंतर कुलकर्णी मॅडम ह्या त्यांचेकडे आलेल्या इतर लोकांशी बोलत होत्या. त्यानंतर काही वेळ गेल्यानंतर कुलकर्णी मॅडम यांनी मला माझे काम शंभर टक्के करून देत असल्याचे सांगून माझ्याकडे पैशांबाबत इशारा करून माझ्याकडे आले की शंभर टक्के काम होणार असल्याचे सांगीतले. त्यावेळी मी त्यांना किती असे विचारून मी गरीब माणूस असल्याचे सांगीतले. त्यावेळी कुलकर्णी मॅडम यांनी मला सोमवार नंतर या त्यावेळी बोलू असे सांगीतले. त्यानंतर मी कुलकर्णी मॅडम यांना वडीलांना वीस सांगीतले होते असे सांगीतले. त्यावर कुलकर्णी मॅडम यांनी मला काय द्यायचे ते द्या असे म्हणाले. त्यावर मी त्यांना तुम्हीच सांगा असे म्हणालो. त्यानंतर कुलकर्णी मॅडम यांनी आमच्या कामाबाबत चर्चा केली. त्यानंतर कार्यालयात कामा निमित्त आलेल्या लोकांशी त्यांनी चर्चा केली. काही वेळानंतर मी कुलकर्णी मॅडम यांना नक्की किती असे विचारले. त्यावर कुलकर्णी मॅडम यांनी आमच्या कामामध्ये करावे लागणारी त्यांची कामे व कागदपत्रांबाबत मला सांगून आमचे प्रकरण दोन वर्षापासून थांबले आहे असे सांगीतले व जे योग्य वाटेल ते बघा येवढयाने पण होणार नाही असे सांगीतले. त्यावर मी त्यांना किती द्यायचे असे विचारले असता कुलकर्णी मॅडम यांनी मला "आत्ता मी सांगीतलय त्याच्यात चार पाच कमी होतील" असे सांगीतले. त्यावर मी त्यांना नक्की किती असे विचारून त्याची जुळणी करतो असे सांगीतले. त्यावर कुलकर्णी मॅडम यांनी मला " तुम्ही करून आणा तुमचे जेवढे कमी पडतात तेवढे मी घालतो" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पुन्हा द्यायचे किती असे विचारले. त्यावर कुलकर्णी मॅडम यांनी मला खालून सगळे, मॅनेजमेंट लावावी लागेल असे सांगून "तुमची प्रोसेस पुढे होईपर्यंत मागची प्रोसेस व्यवस्थीत व्हावी लागते" असे म्हणाले. त्यानंतर मी कुलकर्णी मॅडम यांना वीस हजारामध्ये कमी करण्याबाबत विनंती केली. त्यावर कुलकर्णी मॅडम यांनी मला " मी त्या दिवशी त्यांना म्हणत होतो, प्रोसिजरला घेऊया, तुमच्यावर डिपेंड राहिल ना" असे म्हणाले. काही वेळानंतर मी कुलकर्णी मॅडम यांना किती द्यायचे असे पुन्हा विचारले. त्यावर त्यांनी मला अमोल जवळ सांगतो असे म्हणून काय असेल ते फुल अँन्ड फाईनल त्यात काय कमी जास्त होणार नाही असे म्हणाल्या. त्यावर मी मॅडमना अमोल ओळखीचा असल्याचे सांगून तुम्हीच सांगा असे म्हणालो. त्यावर कुलकर्णी मॅडम यांनी मला डॉक्युमेंट व्यवस्थीत असल्याचे सांगून कामाला दिशा देऊन साहेबांच्या पर्यंत बसून करून घ्याव लागेल असे म्हणाल्या. त्यानंतर मी त्यांना काय असेल ते लिगली असल्याचे सांगून तुम्ही म्हणाल्याप्रमाणे करतो असे सांगीतले व पैसे कमी करण्याबाबत विनंती केली. त्यानंतर मी त्यांना सर्कल साहेबांनी काम करून देण्यास सांगीतले असल्याचे सांगीतले. त्यावर त्यांनी सगळ्या गोष्टी काय सांगता येत नाही, आमच्या लेवलला अडचणी असत्यात असे म्हणाल्या. तसेच कुलकर्णी मॅडम यांनी पैसे दिल्यानंतर कामाला शंभर टक्के वेग येणार आहे, काम होत असेल तर होय म्हनणार, होत नसेल तर नाय होत असे म्हणाल्या. त्यावर मी कुलकर्णी मॅडम यांना दहा हजार पर्यंत करण्याबाबत विनंती केली. त्यावर कुलकर्णी मॅडम यांनी होत नसल्याचे सांगून जेवढे अव्हेलेबल असतील तेवढ्यात करू या असे म्हणाल्या. त्यावर मी त्यंना अव्हेलेबल करीत असल्याचे सांगीतले. त्यावर कुलकर्णी मॅडम यांनी मला काम करताना सांगीतला दोन तीन हेलपाटे होत असल्याचे सांगून पाचशे ते हजार रूपये खर्च होतो,कलेक्टर ऑफिसला कोणी पावना नसतो, कलेक्टर ऑफिसला गेल की खर्च येतो, डॉक्युमेंट सगळे काढले पाहिजेत त्याप्रमाणे बघीतल पाहिजे असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना दिल्यानंतर किती दिवसांत काम होईल असे विचारले असता कुलकर्णी मॅडम यांनी महिन्याभरामध्ये होईल असे सांगीतले. त्यावर मी त्यांना दिल्या शिवाय होणार नाही का असे विचारले असता कुलकर्णी मॅडम यांनी त्याशिवाय होणार नाही असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना शेवटचं सांगा असे म्हणालो असता. त्यांनी ते सांगीतले असल्याचे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना पुन्हा विचारले असता त्यांनी साहेबांना विचारून सांगतो



Scanned with OKEN Scanner

असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना तुमचे किती असे विचारले असता कुलकर्णी मॅडम यांनी चेष्टे मध्ये एक लाख रूपये द्या असे म्हणाल्या. त्यानंतर कुलकर्णी मॅडम यांनी असल्या गोष्टी असत्यात ते दहा पंधरा गुंठे मिळणार असते तर एवढा विचार न करता मी जाऊंदे म्हणाल असत असे म्हणाल्या. त्यावर मी त्यांना वीस हजार दिल्यानंतर काम होणार ना असे विचारले असता कुलकर्णी मॅडम यांनी शंभर टक्के होणार असे म्हणाल्या. त्यानंतर कुलकर्णी मॅडम यांनी कामाबाबत चर्चा केली. कुलकर्णी मॅडम यांनी मला काम झाल नाहीत तर तुमच तुम्हाला द्यायची जबाबदारी माझी आहे असे सांगीतले. कुलकर्णी मॅडम यांनी मला जाण्यास सांगीतल्या नंतर मी व पंच कांबळे असे माझ्या मोटर सायकलीवरून रवाना होऊन पुजारी साहेब यांचे समक्ष हजर झालो.

पुजारी साहेब यांनी केले इशा-यावरून मी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर त्यांचेकडे दिला. पुजारी साहेब यांनी मला व पंच कांबळे यांना घडलेली हकिगत विचारली त्याप्रमाणे आम्ही हकिगत सांगीतली. त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण मी, पुजारी साहेब व दोन्ही पंचानी ऐकून खात्री केली.

तलाठी कुलकर्णी मॅडम यांनी माझ्या वडीलांचे नावच्या पुनर्वसनासाठी शासनाने संपादीत केलेल्या जमीनीच्या 7/12 उतारा-यावर कब्जेपट्टीप्रमाणे दुरूस्ती करून देण्यासाठी माझ्याकडे 20,000/- रूपये लाचेची मागणी करून चर्चेअंती 15000/- रूपये लाचेची मागणी करून सोमवारी येण्यास सांगीतले असल्याने दि.10.10.2022 रोजी कुलकर्णी मॅडम तलाठी खेराडे वांगी यांचे विरूध्द सापळा लावण्याचे एसीबी पथकाने ठरवले.

त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला दि.10.10.2022 रोजी दुपारी एक वाजण्याचे सुमारास खेराडे वांगी येथे हजर राहण्याबाबत व संपर्क केल्यानंतर भेट घेण्याबाबत सुचना दिल्या व मला जाण्यास सांगीतले त्याप्रमाणे मी निघून गेलो.

त्यानंतर आज दि.10.10.2022 रोजी पुजारी साहेब यांनी संपर्क केल्यानंतर दुपारी एक वाजण्याचे सुमारास खेराडे वांगी गावाच्या काही अंतरावर बाहेर विटा रोडवर जाऊन पुजारी साहेब यांची भेट घेतली. पुंजारी साहेब यांचे सोबत घाटगे साहेब, दोन्ही शासकीय पंच व सापळा पथक हजर होते. पुजारी साहेब यांनी मला त्यांचेकडील वाहनामध्ये बसण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी जाऊन बसलो.

त्यानंतर पुजारी साहेब यांनी कुलकर्णी मॅडम तलाठी यांना लाच म्हणून देण्यासाठी लाच रक्कम 15,000/- रूपये हजर करणेस सांगीतली. मी माझ्या कडे फक्त 9,000/- रूपयेच रक्कम उपलब्ध असल्याचे पुजारी साहेब यांना सांगीतले. त्यावेळी पुजारी साहेब यांनी उर्वरीत रक्कमेसाठी डमी नोटा वापरण्याचे ठरवून त्यांचेकडील 2000 असे छापील असलेल्या तीन डमी नोटा मला व दोन्ही पंचाना दाखवल्या. मी माझ्याकडे उपलब्ध असलेली 9,000/- रूपये भारतीय चलनातील नोटा पुजारी साहेब यांचे समक्ष हजर केल्या. त्यावेळी सदर 9,000/-रुपयाचे नोटांचे तसेच डमी नोटांचे नंबर पुजारी साहेब यांनी एका को-या कागदावर पंचाचे समक्ष लिहून घेतले. त्यानंतर पुजारी साहेबांच्या सुचनेवरून दोन्ही पंचांनी माझी अंगझडती घेतली. त्यानंतर पुजारी साहेब यांनी अँथ्रासिन पावडरचे उपयोग व गुणधर्म सांगीतले. त्यानंतर मकानदार पोलीस यांनी 9,000/- रुपये रकमेच्या नोटांना तसेच 2000/- रूपये छापील असलेल्या तिन डमी नोटांना अँथ्रासिन पावडर लावून भारतीय चलनातील नोटा व डमी नोटा एकत्रीत केल्या व सदरची लाच रक्कम माझ्या शर्टच्या समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवली. त्यानंतर पुजारी साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकार्डर मध्ये नवीन कार्ड टाकले. त्यानंतर पुजारी साहेबांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकाला आवश्यक त्या सुचना दिल्या.

त्यानंतर पुजारी साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरू करून माझ्याकडे दिला. मी व पंच कांबळे असे माझ्याकडील मोटर सायकलीवरून रवाना होऊन तलाठी कार्यालय खेराडे वांगी येथे दाखल झालो. मी व पंच कांबळे असे कार्यालयाच्या आत गेलो असता तलाठी कार्यालयात लोकांची गर्दी होती. कुलकर्णी मॅडम यांनी मला थोड्यावेळाने या, लोकांची गर्दी जाऊ दे असे म्हणाल्या. आम्ही काही वेळ त्या ठिकाणी थांबून राहीलो. काही वेळाने मी कुलकर्णी मॅडम यांना सांगीतल्या प्रमाणे पंधरा आणल्याचे सांगीतले. त्यावर कुलकर्णी मॅडम यांनी मला पाच मिनिट बसा असे म्हणून काम केल्यासारख मला पण समाधान असे म्हणाल्या. कुलकर्णी मॅडम यांनी मला बोलवते त्याच वेळेला यायच असे म्हणून फि जमा करून जावा असे म्हणून पैशांची मागणी केली त्यावेळी मी माझ्या शर्टच्या समोरील डावे बाजूच्या खिशात ठेवलेली 15,000/- रूपये रक्कम माझ्या उजवे हाताने बाहेर काढून कुलकर्णी मॅडम यांचे समोर धरली असता त्यांनी ती त्यांचे उजवे हाताने स्विकारून त्यांचे बाजूस असलेल्या पर्सच्या मागील कप्प्याची चेन उघडून त्या कप्यामध्ये लाचेची 15,000/- रूपये रक्कम ठेवली. त्यानंतर कुलकर्णी मॅडम यांनी मला, बोलवते त्यावेळी येण्याबाबत सांगून उतारा झालेला कोणाला कळणार नाही, जरी कळाला तरी विषय करायचा नाही असे म्हणाल्या. त्यानंतर कुलकर्णी मॅडम यांनी मला माझा नंबर देण्याबाबत सांगीतला त्याप्रमाणे मी माझा मोबाईल क्रमांक त्यांना सांगीतला. कुलकर्णी मॅडम यांनी मला माझे चुलते जोतीराम यांना याबाबत सांगायचे नाही असे सांगून फोन



Scanned with OKEN Scanner

केल्यानंतर तहसिलदार ऑफिसला या असे सांगीतले. त्यानंतर मी तलाठी कार्यालयाच्या बाहेर येऊन माझा डावा हात माझे डोक्यावरून फिरवून लाच स्विकारलेबाबत पुर्वनियोजीत इशारा केला. लागलीच पुजारी साहेब, व पथक माझ्या जवळ आले. पुजारी साहेब यांनी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताब्यात घेतला. त्यावेळी मी पुजारी साहेब यांना कुलकर्णी मॅडम यांनी लाच स्विकारलेचे सांगीतले. पुजारी साहेब यांनी मला बाजूला थांबण्याबाबत सांगीतले. पुजारी साहेब, पंच साखळकर व सापळा पथक असे तलाठी कार्यालयाच्या आत गेले. काही वेळानंतर पुजारी साहेब यांनी मला तलाठी कार्यालयामध्ये बोलावून घेवून कार्यालयामध्ये अंधार करुन माझे हात व कपडे तपासण्यात आले. त्यावेळी माझे उजवे हाताचे बोटावर व शर्टच्या समोरील डावे बाजूच्या खिशाचे तोंडास अँन्थ्रासिंन पावडरची चकाकी दिसून आली. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला बाहेर जावुन थांबण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी बाहेर जावुन थांबलो.
पुजारी साहेबांनी त्यांची पुढील कारवाई सुरु ठेवली. त्यांनतर थोडयावेळाने पुजारी साहेबांनी मला बोलावून घेतले. त्यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी माझी अंगझडती घेतली, त्यानंतर मला कार्यालयाच्या बाहेर जावून थांबण्यास सांगीतले, त्याप्रमाणे मी बाहेर जावून थांबलो. त्यानंतर पुन्हा थोडया वेळाने पुजारी साहेब यांनी मला बोलावुन घेवुन सापळ्याची हकीकत विचारली. त्यावेळी मी त्यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगीतली. पुजारी साहेबांनी घडले घटनेचा सविस्तर पंचनामा केला. सदर कारवाई दरम्यान कुलकर्णी मॅडम यांचे पुर्ण नाव मनिषा मोहनराव कुलकर्णी, तलाठी, तलाठी कार्यालय खेराडे वांगी ता. कडेगांव रा. ब्राम्हणपुरी, इस्लामपूर ता.वाळवा जि. सांगली असे असल्याचे मला समजले आहे.
माझा वडीलांची शासनाने पुनर्वसन साठी जमीन संपादित करतेवेळी कब्जेपट्टीप्रमाणे चुकलेली 7/12 वरील आणेवारी दुरूस्त करून देण्याकरीता मनिषा मोहनराव कुलकर्णी, तलाठी, तलाठी कार्यालय खेराडे वांगी रा. ब्राम्हणपुरी, इस्लामपूर ता.वाळवा जि. सांगली यांनी माझ्याकडे 20,000/- रूपये व चर्चेअंती 15,000/- रूपये लाचेची मागणी करून 15,000/- रूपये लाच रक्कम माझ्याकडून स्विकारली म्हणून माझी त्यांचे विरूध्द फिर्याद आहे.
माझा मराठी मध्ये टाईप केलेला वर्दी जबाब मी वाचून पाहीला, तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेला आहे.

समक्ष

हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

PANDURANG SHRIRANG BHOPALE(I (Inspector)) / BOBN83780

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.**
**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant:**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

GAHA

**15.Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** PANDURANG SHRIRA
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN83780

पोलीस स्टेशन ऑफीसर
कडेगांव पोलीस ठाणे



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect- (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner